संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)
जनसंपर्क विभाग

## विद्यापीठाचे २०२० व २०२१ वर्षाचे उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार जाहीर
## १ मे रोजी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे शुभहस्ते पुरस्कार वितरण

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने २०२० व २०२१ या दोन वर्षाचे उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार दि. १ मे, २०२१ रोजी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे हस्ते आभासी पद्धतीने प्रदान केल्या जाणार आहे. विद्यापीठ स्तर, संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था स्तर आणि नाविन्यपूर्ण उपक्रम अशा वर्गवारीत हे पुरस्कार प्रदान केले जातील. रौप्यपदक, गौरव प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरुप राहणार आहे.

सन २०२० च्या विद्यापीठ स्तरावरील उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार शिक्षक संवर्गात पदव्युत्तर मराठी विभागप्रमुख डॉ. मोना चिमोटे, द्वितीय श्रेणी अधिकारी वर्गवारीत परीक्षेच्या सारणी विभागातील अधीक्षक श्री विवेकानंद इताल, तृतीय श्रेणी कर्मचारी वर्गवारीत आस्थापना विभागातील वरीष्ठ सहायक श्री श्रीकांत तायडे, चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गवारीत वित्त विभागातील शिपाई श्री बाबाराव चौधरी यांना, तर संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक स्तरावरील उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार संवर्गात एल.आर.टी. महाविद्यालय, अकोलाचे प्राचार्य डॉ. श्रीप्रभू चापके व संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गवारीतून ॲड. रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालय, वाशिम येथील शिपाई श्री राहूल पांडे यांना पुरस्कार घोषित झाला आहे. नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी गाडगे महाराज महाविद्यालय, मुर्तिजापूर, जि. अकोला या महाविद्यालयाची निवड करण्यात आली असून रू. ५००१/- रोख पुरस्कार व प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

सन २०२१ च्या विद्यापीठ स्तरावरील उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार शिक्षक संवर्गात ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागप्रमुख डॉ. वैशाली गुडधे, प्रथम श्रेणी अधिकारी वर्गवारीत कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, द्वितीय श्रेणी अधिकारी वर्गवारीत गोपनीय विभागातील अधीक्षक कु. जयश्री खंडे, तृतीय श्रेणी कर्मचारी वर्गवारीत अभियांत्रिकी विभागातील तांत्रिक सहायक श्री गजानन वनस्कर, चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गवारीत व्यवसाय प्रशासन व प्रबंधन विभागातील शिपाई श्री प्रभाकर सहारे यांना, तर संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक स्तरावरील उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार संवर्गात एल.आर.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोलाचे प्राचार्य डॉ. विजय नानोटी, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक वर्गवारीत लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, जि. यवतमाळच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. सुनंदा आस्वले व संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गवारीतून महात्मा फुले कला व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड, जि. अमरावती येथील ग्रंथालय लिपीक श्री जितेंद्र इंगळे यांना पुरस्कार घोषित झाला आहे. नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, जि. यवतमाळ या महाविद्यालयाची निवड करण्यात आली असून रू. ५००१/- रोख पुरस्कार व प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारप्राप्त सर्व प्राचार्य, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी अभिनंदन केले आहे. कार्यक्रमामध्ये ऑनलाईन सहभागी होण्यासाठी लाईव्ह युट्युब लिंक लवकरच पुरविण्यात येणार आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २४/०४/२०२१.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी